ठाणे महानगरपालिका,ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २६/११/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सुचना

सभा सूचना क्रमांक ७ दिनांक २६/११/२००९

प्रति,

सन्मा.श्री/श्रीमती ----------
सदस्य / सदस्या,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

ठाणे महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा **गुरुवार** दिनांक **३/१२/२००९** रोजी ठाणे महानगरपालिकेच्या **"डॉ.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात"**सभा सूचना क्रमांक ७ दिनांक २६/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्याकरीता **सकाळी ११.००** वाजता बोलविण्यात येत आहे.

मा.विभागीय आयुक्त आणि
मा.महानगरपालिका आयुक्त यांचे आदेशान्वये.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

-

सभा सूचना क्रमांक ७ दिनांक २६/११/२००९ रोजीची विषयपत्रिका.

प्रकरण क्रमांक	**विषय**
१४९	मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६नुसार) ठाणे महानगरपालिकेच्या :"महापौर " पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.

१५० मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) (५)मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची (सुधारणा नियम २००६नुसार) ठाणे महानगरपालिकेच्या :"उपमहापौर " पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक :- २६/११/२००९

सोबत :-
१. महापौर व उपमहापौर निवडणूकीचा कार्यक्रम व नामनिर्देशन पत्र

२. नामनिर्देशित सदस्यांच्या नेमणूकीबाबत अर्हता नियम व प्रतिज्ञापत्राचा नमुना.

टिप :-
दि.१७/११/२००९ रोजी नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई येथे जाहिर झालेल्या महापौर पदाच्या सोडतीनुसार ठाणे महानगरपालिकेचे महापौर पद खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका,ठाणे

गुरुवार दिनांक ३ डिसेंबर २००९ रोजी होणा-या महापौर / उपमहापौर यांचे निवडणूकीचा कार्यक्रम

अ.क्र	वार	तारीख	वेळ		तपशिल
१	रविवार	२९/११/२००९	कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं.५.०० वा.पर्यत) दु.१.३० ते २.०० वा.जेवणाची सुट्टी वगळून.		महापौर / उपमहापौर पदाचे निवडणूकीसाठी विहित नमुन्यात नामनिर्देशनपत्रे महापालिका सचिव यांचेकडे नामनिर्देशनसाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने महापालिका सचिव कार्यालय,नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला,पांचपाखाडी,ठाणे (पश्चिम) येथे सादर करणे.
२	गुरुवार	३/१२/२००९	सकाळी ११.०० वा.		सभेच्या दिवशी सभा सुरु झाल्यावर (अध्यक्ष मा.विभागीय आयुक्त सो यांचे अधिकारात)
				१.	नामनिर्देशनाची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे.
				२.	वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे वाचून दाखविणे.
				३.	त्यानंतर १५ मिनिटांनी अध्यक्ष यांचेकडे लेखी नोटीस देऊन उमेदवारी मागे घेणे.(पोटनियम ६(३) अन्वये आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देणा-या कोणत्याही व्यक्तीस ती नोटीस रद्द करण्याची परवानगी नसेल.)
				४.	अध्यक्ष उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांचे नांवे पालिका सदस्यांना वाचून दाखवतील.
					निवडणूक प्रक्रिया आणि निवडणूकीचे निकाल घोषित करणे.
				१.	जर एकच वैध नामनिर्देशन करण्यांत आले असेल तर महापौर / उपमहापौर

					पदाकरीता त्यांची निवड झाल्याचे जाहिर करण्यात येईल.
				२.	जर एकापेक्षा अधिक नामनिर्देशन करण्यात आले असतील तर अध्यक्ष निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नांवे वर्णानुक्रमे लावतील.
				.	महापौर / उपमहापौर निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवाराचे नांव वर्णानुक्रमाने घोषित करतील आणि **''हात वर करुन मतांची नोंद घेण्यात येईल.''**
				३	ज्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची नांवे कार्यवृत्तांत नोंदविण्यांत येतील. ज्या सदस्यांनी मतदान केले नसेल अशा पालिका सदस्यांची नांवे देखील कार्यवृत्तांतामध्ये नोंदविण्यात येतील.
				४.	ज्या उमेदवाराला मतदानात सर्वात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे
दिनांक :- २६/११/२००९

टिप :- महापौरांची अथवा उपमहापौराची निवड करण्यासाठी अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल.

प्रति,
मा.जिल्हाधिकारी सो.
ठाणे जिल्हा, ठाणे.

विषय :- ''महापौर'' व ''उप महापौर'' पदासाठी दाखल
झालेल्या नामनिर्देशन पत्राबाबत.

''महापौर'' व ''उप महापौर'' पदासाठी नामनिर्देशन पत्र सादर करणेकामी २९ नोव्हेंबर २००९ रोजीचा दिवस निश्चित करण्यांत आलेला होता. सदर दिवशी खालीलप्रमाणे नामनिर्देशनपत्र सादर करण्यात आली आहेत.

''महापौर'' पदासाठी (१) श्री.नजीब सुलेमान मुल्ला - राष्ट्रवादी काँग्रेस.
(२) श्री.अशोक बारकू वैती - शिवसेना.

या दोन उमेदवारांनी आपापली नामनिर्देशन पत्रे सादर केलेली आहेत.

तसेच **''उप महापौर''** पदासाठी (१) श्री.सुभाष आत्माराम खारकर - काँग्रेस.
(२) श्री.लासे मनोज विठठल - शिवसेना.
(३) श्री.लासे मनोज विठठल - शिवसेना.

यांनी आपापली नामनिर्देशन पत्रे सादर केलेली आहेत.

माहितीसाठी सविनय सादर.

(सौ.छाया मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत :-आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी सोबत प्रत सविनय सादर.